SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-02312692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र University WEBSITE : www.unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A' Grade

Dr. R. V. Gurav
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि / विद्यार्थी विकास / 103 दि. 19 / 12 / 2020

प्रति,

1. प्राचार्य / संचालक,
   सर्व संलग्न महाविद्यालये व
   मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
2. मा. विभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– ऑनलाईन सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केलेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2020–2021 मध्ये विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये व अधिविभागामध्ये प्रवेशित विद्यार्थ्याकरिता ऑनलाईन पध्दतीने **1. नृत्य (एकल) 2. सुगमगायन 3. वक्तृत्व (मराठी) 4. ढोलकीवादन 5. एकपात्री अभिनय** या सांस्कृतिक स्पर्धा (वैयक्तीक) आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तरी सदरचे परिपत्रक आपले महाविद्यालय / अधिविभागात प्रवेशित विद्यार्थ्यांचे निदर्शनास आणून द्यावे व त्यांना सदर ऑनलाईन स्पर्धेमध्ये सहभागी होणेसाठी प्रेरित करावे. **सोबत ऑनलाईन स्पर्धेची नियमावली जोडली आहे.**

स्पर्धेमध्ये सहभागी होणेसाठी ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा अर्ज **https://forms.gle/uZCbFmPCN8CfR3Ca6** या लिंकवर ठेवण्यात आला आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होणेचे अर्ज **दि. 30 / 12 / 2020** अखेर लिंकवर अपलोड करण्यात यावेत

स्पर्धेचा व्हिडीओ टेलीग्राम अकाऊंटवर अपलोड करावयाचा आहे. व्हिडीओ अपलोड करण्याचा कालावधी **दि. 02 ते 10 जानेवारी 2021** असा आहे. व्हिडीओ टेलीग्रामवर अपलोड करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील सांस्कृतिक समन्वयकांचा मोबाईल नंबर या विभागाकडे पाठविण्यात यावा हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,
(स्वाक्षरी)
संचालक
विद्यार्थी विकास

सोबत – ऑनलाईन स्पर्धेची नियमावली.

D:ACER BACKUP/acer backup/DSW/LIC/LIC circular 2017

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन स्पर्धा

# नियमावली व प्रवेशिका अर्ज

# शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन स्पर्धा

## नियमावली

1. प्रत्येक स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातून फक्त एकाच विद्यार्थ्याला भाग घेता येईल.
2. प्रत्येक स्पर्धेसाठी वेगळया प्रवेशिका सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात खालील लिंकवर दि.30/12/2020 पर्यत भरण्यात याव्यात. या निर्धारीत वेळेनंतर आलेल्या प्रवेशिकांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

   **Link -- https://forms.gle/uZCbFmPCN8CfR3Ca6**

3. स्पर्धेचे व्हिडीओ अपलोड करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील सांस्कृतिक समन्वयक यांना टेलीग्राम अकाऊंट मोबाईल/संगणकावर ओपन करण्यास सांगून तो नंबर विभागाकडे कळविणे आवश्यक आहे. सदर नंबर या विभागाकडे दिल्यानंतर या विभागाकडील टेलीग्राम अकाऊंटवर समाविष्ठ करण्यात येईल. स्पर्धेचे व्हिडीओ टेलीग्रामवर अपलोड करणे बंधनकारक आहे. अन्य प्रकारे आलेले व्हिडीओ ग्राहय धरले जाणार नाहीत.
4. सदर स्पर्धेचे निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल. तसेच महाविद्यालयाच्या ई–मेलवर पाठविण्यात येतील.
5. सदर स्पर्धेसाठी कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही.

**विविध स्पर्धा प्रकारांसाठी नियमावली**

1. **नृत्य (एकल) :**
   1. प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकाला भाग घेता येईल
   2. नृत्य किमान 4 मिनिटांचे व कमाल 5 मिनिटांचे असावे. जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
   3. नृत्यासाठी वेषभूषा, रंगभूषा व पार्श्वसंगीत अनुषंगीक आणि सुसंगत असणे आवश्यक आहे.
   4. सिनेसंगीतावर आधारीत नृत्यास परवानगी नाही.
   5. अश्लील व बिभत्स नृत्य सादर करणाऱ्या स्पर्धकावर कडक कारवाई करण्यात येईल.
   6. मुल्यमापन तालबध्दता, रचना, मुद्रा, रंगभूषा, वेषभुषा व सादरीकरण इ. बाबींवर अवलंबून राहील.
   9. या स्पर्धेत जास्तीत जास्त 3 साथीदारांचा वापर करता येईल. साथीदाराऐवजी प्रसंगी पूर्व ध्वनिमुद्रीत/रेकार्डेड संगीताचा वापर करता येईल.

2. **सुगम गायन :**
   1. प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकाला भाग घेता येईल.
   2. प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त दोन साथीदारांचा (एक पेटीवादक व एक तबला वादक) वापर करता येईल.
   3. प्रत्येक गायकाला किमान 4 मिनिटांचा व कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
   4. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
   5. या स्पर्धेत भावगीत, भक्तीगीत, भजन, गझल आणि अभंग सादर करता येईल.
   6. स्पर्धेचा निर्णय गीताची निवड, स्वर, सादरीकरण, आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
   7. चित्रपटातील गीतास परवानगी नाही.

3. वक्तृत्व :

1. ही स्पर्धा मराठी भाषेत आयोजित केली जाईल.
2. महाविद्यालयांना स्पर्धेसाठी फक्त एकाच स्पर्धकाची नोंदणी करता येईल.
3. प्रत्येक स्पर्धकास किमान 4 मिनिटांचा व कमाल 5 मिनीटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
4. स्पर्धेसाठी समितीने ठरविलेले / निवडलेले विषय :
   - **i) नवीन शैक्षणिक धोरण**
   - **ii) कोरोनाचा शैक्षणिक क्षेत्रावरील परिणाम**
   - **iii) भारताचे परराष्ट्र धोरण**

**4. ढोलकीवादन**

1. या स्पर्धेसाठी ढोलकी या वाद्याचा समावेश असेल.
2. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल .
3. स्पर्धकास किमान 4 मिनिटांचा व कमाल 5 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
5. स्पर्धेसाठी जास्तीत जास्त 3 साथीदार वापरता येतील.
6. स्पर्धेचे मुल्यमापन लय, ताल, सुरेलपणा व सादरीकरण इ. बाबींवर अवलंबून राहील.

**5. एकपात्री अभिनय (मराठी, हिंदी आणि इंग्रजी)**

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. प्रत्येक स्पर्धकाला किमान 4 मिनिटे व कमाल 5 मिनिटे वेळ दिला जाईल.
3. स्पर्धेचा विषय स्वतः निवडावा (स्वरचित एकपात्री प्रयोग किंवा नाटकातील उतारा सादर करता येईल).
4. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची समर्पकता, त्वरीत मिळालेली प्रतिक्रिया व अभिनय इ. बाबींवर अवलंबून राहील.
5. स्पर्धेमध्ये मराठी, हिंदी तसेच इंग्रजी भाषेचा वापर करता येईल.

## ऑनलाईन आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची संक्षिप्त माहिती

| अ.क्र. | स्पर्धा | स्पर्धक (कमाल) | साथीदार (कमाल) | किमान वेळ | कमाल वेळ | अधिकचा वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| वैयक्तीक स्पर्धा :– | | | | | | |
| 1 | नृत्य (एकल) | 1 (एक) | 3 (तीन) | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 2 | सुगमगायन | 1 (एक) | 2 (दोन) | 4 मिनिटे | 6 मिनिटे | 15 सेकंद |
| 3 | वक्तृत्व : मराठी | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 4 | ढोलकीवादन | 1 (एक) | 3 (तीन) | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 5 | एकपात्री अभिनय | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |

## स्पर्धेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे

1. **स्पर्धेची नोंदणी – दि. 21 ते 30 डिसेंबर 2020**
2. **व्हिडीओ अपलोड करण्याचा कालावधी – दि. 02 ते 10 जानेवारी 2021**
3. **स्पर्धेचे परिक्षण व निकाल – दि. 11 ते 20 जानेवारी 2021**

संपर्क –
ऑफिस : 0231–2609175
Email id- dsw@unishivaji.ac.in

संचालक,
विद्यार्थी विकास
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

साक्षांकित
फोटो

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## ऑनलाईन स्पर्धा 2020–2021
## स्पर्धक / साथीदार नोंदणी व पात्रता फॉर्म
**(प्रत्येक स्पर्धेकरिता वेगवेगळा अर्ज भरावा)**

महाविद्यालयाचे नांव : ------------------------------------
सहभागी स्पर्धकाचे नाव : ------------------------------------
जन्म तारीख : / /
शिकत असलेला वर्ग :
स्पर्धक म्हणून भाग घेतलेला स्पर्धा प्रकार : 1. ------------------------------

साथीदारांची नांवे : 1. ------------------
2. ------------------
3. ------------------
कायमचा पत्ता : ------------------------------------

मोबाईल क्रमांक : ई मेल :

ठिकाण :
दिनांक : / /20 स्पर्धकाची सही

---

प्रमाणित करणेत येते की, सदर स्पर्धक आमच्या महाविद्यालयाचा नियमित विद्यार्थी आहे.

प्रमुख, सांस्कृतिक विभाग

प्राचार्य
(सही व शिक्का)